ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | खंडोबाची गोष्ट |
| प्रकाशक | : | बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, बॉम्बे |
| प्रकाशन वर्ष | : | १८९२ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

# KHANDOBA AND HIS WORSHIP.

# खंडोबाची गोष्ट.



BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
9th Edition, 1892.

मुंबईमध्यें:
एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

१८९२.

*Price 3 Pies.* किंमत ३ पै.

# KHANDOBA AND HIS WORSHIP.

---

## खंडोबाची गोष्ट.



BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

9th Edition.

5,000 Copies. A. D. 1892.

---

मुंबईमध्यें :

एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यांत छापिलें.

---

सन १८९२.

# KHANDOBA AND HIS WORSHIP.

## खंडोबाची गोष्ट.

पुणें शहरांत गंगाधर शास्त्री ह्मणून एक कोंकणस्थ ब्राह्मण राहत असतो, तो माझा परम स्नेही आहे. मी एका दिवशीं त्याच्या घरीं त्याच्या भेटीस गेलों, तों तेथें शास्त्रीबावा, एक कुणबी, आणि एक देशस्थ ब्राह्मण, असे तिघेजण गोष्टी करीत बसले होते. त्या कुणब्याचीं वस्त्रें पिवळीं, व गळ्यांत रुप्याचें भूषण होतें. कोठें लांबची मजल केल्यामुळें तो दमलेला व काळा झाला होता. तेव्हां शास्त्रीबावाची व माझी सलामी झाल्यानंतर मी ह्मणालों, शास्त्रीबावा, हे पाटील कोणत्या गांवाहून आले? यांचें नांव काय? हे फार दमले आहेत, असें वाटतें. यांच्या अंगावरील वस्त्रें अशीं पिवळीं कां झालीं? यांच्या गळ्यांत जें चमत्कारिक भूषण आहे त्याचें नांव काय?

**शास्त्री**–यांस मल्हारी पाटील ह्मणतात, हे माझे परम मित्र आहेत. हे आतांच जेजुरीची वारी करून आले, यामुळें फार दमले आहेत. यांचीं वस्त्रें भंडारानें पिवळीं झालीं. यांच्या गळ्यांत खंडोबाचा शिक्का आहे, त्याला गेठा ह्मणतात.

**साहेब**–कां पाटील, तुह्मी खंडोबाचे भक्त आहां काय?

**पाटील**–होय साहेब, केवळ मीच त्याचा भगत झालों असें नाहीं, तो सुमारें पंधरा वीस पिढ्यांपासून आमच्या घराण्याचा देव आहे. त्याचा टांक आमच्या देवांत मांडला आहे, व आह्मी त्याची दिवटी बुधली पुजीत असतों, तरी मला प्रतिवर्षी एक दोन वेळ त्याच्या यात्रेकरितां जेजुरीस जावें लागतें.

**सा०**–तुह्मी गेलां नाहीं तर खंडोबा तुमचें काय करील?

**पा०**–( कांहींसा कांपून ) असें म्हणूं नका, साहेब. आमचे खंडेराव रागावतील. तशांत जेजुरीचा खंडोबा मोठी जागतीजोत आहे. जर आह्मी त्याचा

कांहीं कुळधर्म करायास चुकलों तर तो लागलेंच तोंड वांकडें करीत असतो.

सा०-(किंचित् हांसून) कां शास्त्रीबावा, तुह्मी जेजुरीस जात असतां कीं काय?

शा०-नाहीं, मी कधीं जात नाहीं.

सा०-तर मग हा खंडोबा तुमच्या बोकांडीस बसणार नाहीं काय?

तेव्हां तेथें रामचंद्रभट ह्मणून एक देशस्थ ब्राह्मण बसला होता, तो ह्मणाला, साहेब, खंडोबा त्यांस पीडा करणार नाहीं, कारण ते कोंकणस्थ आहेत ह्मणून तो त्यांचा देव नाहीं. तो ज्यांचा देव असेल, त्यांसच पीडा करील.

सा०-भटजी बावा, तो तुमचा देव आहे काय?

भट०-होय, आह्मी देशस्थ आहों. जर आह्मी कांहीं कुलधर्म चुकलों तर तो लागलीच पीडा करितो.

सा०-या प्रकारची पीडा करणें हें कोणाचें काम? हें भूताचें काम असें तुमचे लोक बोलत असतात, नाहीं बरें?

भट०-होय, बोलत असतात खरें.

**सा०**–तर मग हा तुमचा खंडोबा भूत आहे किंवा देव आहे?

**शा०**–या कारणावरून तर तो देव नाहीं, असें मला वाटतें.

**सा०**–खरी गोष्ट. आतां त्याला न मानल्यास तो पीडा करितो, हें तुमचें बोलणें, मुका बोलतो, बहिरा ऐकतो, या ह्मणण्यासारिखें आहे असें मला वाटतें. याविषयीं मी तुह्माला एक गोष्ट सांगतों. मजजवळ केसोपंत ह्मणून एक ब्राह्मण आहे, त्याचे आईबाप खंडोबाचे मोठे भक्त आहेत, आणि केसोपंतहि पूर्वीं खंडोबाला मानीत असे. परंतु अलिकडे चांगला विद्वान् झाला, यामुळें पांच सहा वर्षांपासून खंडोबाला मानीनासा झाला. तरी त्याचें तोंड वांकडें झालें, किंवा दुसरी कांहीं पीडा झाली, असें माझ्या पाहण्यांत अथवा ऐकण्यांतहि आलें नाहीं. उलटा तो अधिक सुखी झाला असें मात्र माझ्या अनुभवास आलें. यावरून खंडोबाला सोडून जो कोणी खऱ्या देवास मानितो, तो कधीं या प्रकारची पीडा भोगीत नाहीं, असें सिद्ध होतें. बरें असो. पाटील-

बावा, ही यात्रा करण्यास तुह्मांला किती दिवस लागले असतील ?

**पा०**–आठ दिवस लागले.

**सा०**–जे लोक फार लांबून येतात त्यांस किती दिवस लागत असतील ?

**पा०**–कदाचित् दोन तीन महिने लागतील.

**सा०**–या कामासाठीं तुह्मांस किती खर्च लागला ?

**पा०**–सुमारें साठ रुपये.

**सा०**–इतका खर्च ! फार चमत्कारिक गोष्ट !

**पा०**–साहेब, हा मोठा खर्च नाहीं. कारण मी आपल्या कुटुंबासुद्धां सहा असामी गेलों होतों.

**सा०**–असो, तुह्मी फार श्रीमंत आहां असें वाटतें.

**पा०**–श्रीमंत कशाचा ? माझ्या डोकीवर आज पांचशें रुपये कर्ज आहे.

**सा०**–जेजुरीस जाऊन असें ऋण वाढवावें ही वेडेपणाची गोष्ट आहे. अंथरुण पाहून पाय पसरावे. अणखी माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, जर कोणी कुणबी केवळ एक दिवस आपलें शेतकीचें काम पाहत नाहीं तर त्याचें मोठें नुकसान होतें.

तुह्मी तर शेताकडे आठ  दिवस ढुंकून देखील पाहिलें नाहीं, यावरून तुमचें फार नुकसान झालें नसेल काय?

**पा०**–नुकसान तर खरेंच. पण काय करावें? कांहीं उपाय नाहीं.

**सा०**–उपाय कां नाहीं? जेजुरीस जाण्याचें कांहीं कारण नव्हतें. बरें, तुह्मी तेथें जाऊन काय केलें?

**पा०**–माझ्या बायकोनें बगाड घेतलें.

**सा०**–(थरारून) बगाड घेणें हें काम मोठें कठिण आहे. तें मीं एकदां पाहिलें होतें. गतवर्षीं भांबुरड्यास रोकडोबापाशीं एक बायको बगाड घेत होती तेव्हां ती येऊन थरथर कांपत भूमीवर पालथी पडली, आणि कांहीं वेळ तशीच मातींत लोळली. मग एका मनुष्यानें तिच्या पाठीवरील वस्त्रें एकीकडे केलीं, तेव्हां मी ह्मणालों, हा तिचा नवरा आहे कीं काय? नाहीं नाहीं, हा रोकडोबाचा पुजारी आहे, असें कोणीएक ह्मणाला. ही लाजेची गोष्ट आहे. परस्त्रीला अन्य पुरूषानें असा हात लावावा, हें शोभत नाहीं, असें मी ह्मणालों. मग त्यानें तिच्या पाठीची कातडी ओढून मोठ्या जोरानें आंत

गळ टोंचला. अशा कामांत रक्त निघत नसतें, असें माझ्या ऐकण्यांत होतें, परंतु त्या वेळेस प्रत्यक्ष रक्त माझ्या पाहण्यांत आलें. मग त्या बाईला उचलून सर्व लोकांसमोर जसें सरकार एखाद्या खुनी मनुष्यास फांशीं देतें, त्याप्रमाणें अधांतरीं उंच टांगलें. ज्या मराठमोळ्या बायकोचें तोंडदेखील अन्य पुरुषाच्या दृष्टीस पडणें कठीण, ती अशी टांगली असतां, आज हजारों लोकांच्या दृष्टीस पडावी, ही केवढी लाजेची गोष्ट आहे! त्या बायकोला ते नीच लोक गोफणगुंड्याप्रमाणें तीन फेरे देणार होते. परंतु ती फारच भ्याली व कांपूं लागली, ह्मणून एकच फेरा दिल्हा. बरें पाटील, तुह्मी आपल्या बायकोकडून असें वाईट काम करविलें काय?

पा०–(कांहींसा रागावून) हें वाईट काम असें तुह्मी कशावरून ह्मणतां? पुष्कळ लोक असें करितात कीं नाहीं?

सा०–जें काम वाईट आहे, तें जरी हजारांनीं केलें तरी तें चांगलें होत नाहीं. पाहा, हजारों लोक चोरी करितात, तरी तें चोरीचें काम चोरीच, तें वाईटच

आहे. बरें पाटील, तुह्मीं तेथें अणखी काय केलें ?

**पा०**–वाघ्यामुरळ्यांचें जाग्रण घातलें.

**सा०**–तें जाग्रण कसें घालतात ?

**पा०**–वाघ्यामुरळ्यांस कांहीं द्रव्य देऊन त्यांस आपल्या घरीं रात्रीं जागायास बोलावून त्यांजबरोबर आपण जागून त्यांच्या तोंडच्या खंडोबाच्या लावण्या ऐकाव्या व कधीं कधीं ऐकणारांच्या खुशीप्रमाणें दुसऱ्याहि लावण्या ऐकाव्या.

**सा०**–एकून तुह्मीं असें जाग्रण घातलें. बरें, मीं लावण्यांचीं कांहीं पुस्तकें पाहिलीं त्यांत हजारों शब्द असे कुत्सित व बीभत्स आहेत कीं, त्या लावण्या माझ्यानें वाचवल्या नाहींत. अशा वाईट लावण्या जेजुरीमध्यें गात असतातना ? शास्त्रीबावा, हे पाटील उगेच राहतात, कांहीं उत्तर देत नाहींत, तुह्मी तरी सांगा.

**शा०**–जाग्रणांतल्या लावण्या बहुतकरून अशाच अगदीं वाईट असतात, यांत संशय नाहीं.

**सा०**–अशा लावण्याहि शूद्र व ब्राह्मण ऐकतातना ?

**शा०**–( कांहीं लाजून ) ऐकतात खरें.

**सा०**–पाटील बावा, तुमच्या देशांत कसबिणी बायका पुष्कळ असतील नाहीं बरें ?

**पा०**–होय, मोठमोठ्या शहरांत तर त्यांची संख्या पुष्कळच आहे.

**सा०**–याचें काय कारण असेल बरें ?

**पा०**–जी बायको शिंदळकी करिती तिला सरकार बरोबर शिक्षा देत नाहीं ह्मणून.

**सा०**–तिचें मन पहिल्यानें या कामाकडे कां फिरलें?

**पा०**–मला काय ठावें ?

**सा०**–बरें, मी सांगतों, ऐका. एक मुख्य कारण हेंच कीं, तुह्मी व तुमच्या बायका जेजुरीस जातां, तेथें लावण्या ऐकतां, तेव्हां त्या लावण्यांतील भ्रष्टकारक असे हजारों बीभत्स शब्द ऐकण्यांत येतात. असे शब्द ऐकावे, हें देवाचें भजन आहे, असें तुह्मांस वाटतें. परंतु जसें अग्नीजवळ तूप ठेविलें असतां वितळतें, त्याप्रमाणें हे बीभत्स शब्द ऐकून तुमचें व तुमच्या बायकांचें मन वितुळतें, आणि वाईट कामाकडे धांवतें. आतां पाहा बरें, ज्या बायका

लावण्या ऐकतात, त्या पतिव्रता कशा राहतील ! कधीं राहणार नाहींत. बरें पाटील, व्यभिचार बंद करण्यास उपाय काय करावा ?

पा०–अशा कामाकरितां शिक्षा करावी हाच उपाय.

सा०–शिक्षा करावी ही गोष्ट खरी, पण कोणाला करावी ! तुह्माला किंवा तुमच्या बायकांला ?

पा०–आह्मांला कां, साहेब ?

सा०–तुह्मी आपल्या बायकांचें मन भ्रष्ट करितां ह्मणून.

पा०–साहेब, हें तुमचें बोलणें अगदीं विपरीत दिसतें, आह्मी त्यांचें मन कधीं भ्रष्ट करीत नाहीं.

सा०–निःसंशय तुह्मीच करितां, तुह्मी त्यांला जेजुरीस नेतां, बगाड घेण्यानें निर्लज्ज करवितां, लावण्या ऐकावितां, या रीतीनें तुह्मी त्यांचें मन भ्रष्ट करितां. ह्मणून तुह्मालाच शिक्षा केली पाहिजे.– आतां आपण वाघ्ये मुरळ्या कोण आहेत, याविषयीं आधीं विचार करूं. कां शास्त्रीबावा, यांची निराळी जात आहे कीं काय ?

**शा०**–निराळी जात कशाची ? जे लोक खंडोबाला आर्पिलेले आहेत, त्यांस हें नांव मिळतें.

**पा०**–साहेब, हे वाघ्ये आमच्या खंडेरावाचे कुत्रे आहेत, आणि मुरळ्या खंडेरावाच्या बायका आहेत.

**सा०**–वः! फार चांगली गोष्ट. बरें, त्यांचें अर्पण कोणत्या हेतूनें करितात ?

**पा०**–जर कोणाला मूल होत नसलें तर मूल होण्यासाठीं किंवा मूल रोगी असल्यास तें बरें होण्यासाठीं, लोक खंडोबाला नवस करून ह्मणतात कीं, हे खंडोबा महराज, मला मूल दे किंवा मुलाला बरें कर, ह्मणजे हें तुला अर्पीन. या नवसाप्रमाणें खंडोबा त्यांस पावला असतां, ते लोक आपलीं लेंकरें त्यास अर्पितात.

**सा०**–ते लोक लग्न करितात कीं काय ?

**पा०**–वाघ्ये लग्न करितात, मुरळ्या करीत नाहींत.

**सा०**–मुरळ्या लग्न करीत नाहींत हें योग्य आहे ?

**पा०**–त्या देवाच्या बायका आहेत ना ? त्यांचें लग्न खंडेरावाशीं लागलेंच आहे. असा नवरा मिळाला असतां, दुसरा कां करावा बरें ?

**सा०**-रे रे, हें काम चांगलें नाहीं. शेताआड चोरी आणि नवऱ्याआड छिनाली. त्यांनीं खंडोबाचें नांव करून इच्छेस येईल त्याप्रमाणें वागावें, नाहीं बरें! शास्त्रीबावा, त्या पतिव्रता तरी असतात काय? नाहीं; सर्व मुरळ्या व्यभिचारिणी असतात, असें माझ्या ऐकण्यांत आहे, हें खरें काय?

**शा०**-साहेब, आपण ह्मणतां ती गोष्ट खरी, त्या वाईट असतात.

**सा०**-पाटील, अशा मुरळ्यांचें जाग्रण ऐकवून आपल्या बायकांचीं मनें भ्रष्ट करावीं हें तुह्मास योग्य वाटतें काय? जेजुरी, पाली इत्यादि गांव मिळून या महाराष्ट्र देशांत पंधरा सोळाशें मुरळ्या असतील, त्या गांवोगांव जाऊन लोकांचीं मनें भ्रष्ट करितात. त्या इतक्या निर्लज्ज असतात कीं कधीं कधीं रस्त्यामध्यें संभावित मनुष्याचा पदर धरून ओढितात. जोंपर्यंत या मुलखांत मुरळ्या आहेत तोंपर्यंत उत्तरोत्तर व्यभिचार फार माजत जाईल. मुरळ्या ह्या व्यभिचार वाढविण्यास मुख्य कारण आहेत. माझ्या ओळखीचा एक साहेब आहे, तो व एक ब्राह्मण वाटेनें जात

असतां त्याला जेजुरीजवळ दिवस मावळला. तेव्हां तो साहेब ह्मणाला, आपण आज या गांवांत मुक्काम करून उदईक पुढें चालते होऊं. मग ब्राह्मण ह्मणाला, रात्र झाली तरी चिंता नाहीं; मी खचीत पुढल्या गांवास जाईन, प्राण गेला तरी या जेजुरींत रहाणार नाहीं. एथें राहिलों तर माझ्या तोंडास काळोखी लागेल. जेजुरी हा गांव व्यभिचाराचें मुख्य स्थान आहे. ह्मणून पाटीलबावा, तुह्मी यापुढें मुरळ्यांचें तोंड देखील पाहूं नका. मुरळ्या जगाला बुडविण्यासाठीं झाल्या आहेत. त्यांचें गाणें जो ऐकतो तोहि जगास बुडवितो. आधींच उल्हास त्यांत फाल्गुन मास, या ह्मणीप्रमाणें तुह्मां हिंदु लोकांची स्थिति आहे. तर आतां जसे लोक सापाला पाहून पळतात, तसे तुह्मी या मुरळ्यांपासून दूर पळा. हें बोलणें खरें आहेना? पाटील, तुह्मास रुचतें कीं नाहीं?

**पा०**–होय साहेब, मुरळ्या फार वाईट आहेत यांत संशय नाहीं. जर मुरळ्या मुळीं नसत्या तर फार बरें होतें.

**सा०**–मुळीं तुमचा खंडोबा वाईट आहे. जर

विहिरींतच पाणी खारें तर पोहऱ्यांत गोड कोठून येईल, सांगा बरें.

**पा०**—( रागावून ) असें कसें ह्मणतां साहेब! आमचा खंडोबा भला आहे.

**सा०**—नाहीं, तो भला कशाचा? तो बायकांस भ्रष्ट करितो.

**पा०**—रे रे अशी गोष्ट कशी बोलतोस? तो बायकांस भ्रष्ट करितो हें कशावरून?

**सा०**—पाटील, तुह्मी रागें भरूं नका. सर्व मुरळ्या खंडोबाच्या स्वाधीन आहेत कीं नाहींत? आणि त्या सव कसबिणी आहेत ना? तर मग खंडोबाला कोणतें नांव द्याव बरें? तो त्या मुरळ्यांस सजा किंवा रजा देत नाहीं, तो त्यांस बोध करीत नाहीं, त्यांच्या इच्छेप्रमाणें तो त्यांस वागूं देतो, ह्मणून त्या वाईट होतात. आणि यांत आश्चर्य नाहीं. जसा देव तसें धुपाटणें.

**पा०**—मुरळ्या वाईट असोत, पण आमच्या वाघ्यांवर तर कांहीं दोष नाहींना साहेब?

**सा०**—नाहीं कां? आहे, जसे तुह्मी वाघापासून

पळतां तसें वाघ्यांपासून पळा. ते फार दुष्ट लोक आहेत.

**पा०**—असें कां ह्मणतां साहेब! ते काय वाईट करितात बरें?

**सा०**—जे लोक वाईट आहेत त्यांमध्यें शिरोमणि हे वाघ्ये आहेत. त्यांच्या कर्माचें वर्णन माझ्यानें करवत नाहीं, परंतु तुह्मी पुसतां ह्मणून थोडेंसें सांगतों. ते लग्न करितात ही एक गोष्ट चांगली आहे. पण ते आळशी, कपटी, लोकांस फसविणारे आणि भ्रष्ट करणारे, असे आहेत.

**पा०**—याविषयीं काय प्रमाण?

**सा०**—आधीं आळसाविषयीं सांगतों. ते गळ्यांत वाघीं घालून व कपाळीं भंडार फांसून व हातांत घांट घेऊन तोंडानें यळकोट ह्मणत मोठ्या डौलानें गांवोगांव भीक मागायास जातात. हें त्यांचें भीक मागणें नव्हे, परंतु लोकांस लुटणें आहे. असे हजारों वाघ्ये भीक मागून उद्योगी लोकांचें द्रव्य लुटतात आणि आपणाला आळशी करून त्यांस भिकेस लावितात. या देशांत हा संकटाचा मुख्य पाया वाघ्ये आहेत. अणखी ते फसविणारे आहेत, याविषयीं

मी एक गोष्ट सांगतों, यावरून तुमची खातरी होईल. गतवर्षीं मी यात्रेस गेलों होतों तेव्हां एक वाघ्या माझ्या पाहण्यांत आला. त्याच्या हातांत मोठा लंगर ह्मणजे सांखळदंड होता. हा लंगर मी तोडितों, अशी तो आपली प्रतिष्ठा मिरवीत फिरत होता, परंतु त्याच्या हातांत जो सांखळदंड होता त्यांतील कांहीं कड्या जुन्या व चांगल्या लोखंडाच्या होत्या व कांहीं नव्या व कच्च्या लोखंडाच्या असून मध्यें अगदीं बारीक होत्या. तेव्हां मी ह्मणालों, हा लंगर तूं तोडतोस काय? तो ह्मणाला, सांखळदंड तोडणें हें खंडोबाचें काम आहे, पण साहेब जर एक रूपया देतील तर मी तोडीन. तेव्हां मी ह्मणालों, हें धर्माचें काम आहे किंवा लोभाचें? तो ह्मणाला, धर्माचें खरें तरी साहेबांनीं मला एक रूपया द्यावा. तेव्हां मी त्या सांखळदंडांतील एक कांहाशी मजबूत कडी दाखवून ह्मणालों, ही कडी तूं तोड, नाहीं तर तुझ्या खंडोबानें तोडली तरी चिंता नाहीं, ह्मणजे मी तुला एक काय, पण पांच रूपये देतों. मग तो स्तब्ध राहिला, आणि लाजून पुढें चालता झाला. दुसऱ्या

दिवशीं मी त्या ठिकाणीं गेलों, तों एका कुणब्यानें त्याला एक रुपया देऊं करून सांखळदंड तोडायास सांगितलें. तेव्हां लंगर तोडतांना त्यानें तो दगडाच्या सापटींत अडकविला, आणि उड्या मारमारून मोठ्या जोरानें सांखळदंड तोडला. पण काय तोडलें! त्यांतील एक कडी, जी कच्या लोखंडाची व नवी असून मध्यें अगदीं बारीक होती ती. ती कडी अद्याप माझ्याजवळ आहे, पाहिजे तर तुह्माला दाखवीन. बरें असो, पाटील, जेजुरीस अणखी काय चमत्कार होत असतात?

**पा०**—तेथें वीर ह्मणून आहेत. ते एक मोठा चमत्कार करीत असतात.

**सा०**—तो कोणता बरें?

**पा०**—ते खंडोबाच्या सामर्थ्यानें अगदीं न भितां आपल्या मांडींत शूराप्रमाणें तरवार भोंसकतात, मग ती काढून जय मिळविल्याप्रमाणें मोठ्या सभारंभानें वाद्यें वाजवीत आपल्या घरीं जातात. हा लहान चमत्कार काय!

**सा०**—हें खंडोबाच्या शक्तीनें घडतें काय?

**पा०**—यांत काय संशय ?

**सा०**—तर मग खंडोबापेक्षां हे पोटभरू गारोडी मोठे चमत्कार करितात. यास्तव तुह्मीं त्या खंडोबाला सोडून या गारोड्यांस देव मानून भजावें, हें बरें. ते बोलतेचालते तरी देव आहेत. पाटीलबावा, मांडींत तरवार भोंसकणें यांत जर तुह्माला चमत्कार वाटतो, तर तुह्मी अगदीं वेडे आहां असें साफ दिसतें. मांडी कापणें यांत कांहीं चमत्कार नाहीं. जसे डोयफोडे भिकारी आपलें आंग कापून रस्तोरस्तीं फिरतात त्यांसारिखे हे वीर लोक आहेत, असें तुह्मी समजा. " नांव सोनुबाई, हातीं कथिलाचा वाळा " असे हे नांवाचे वीर आहेत. आतां चमत्कार कोणता ह्मणाल तर सांगतों, ऐका. मांडी सगळीहि कापली असतां तींतून रक्त निघूं नये, ती पुनः पूर्वींसारिखी बेमालूम जडावी, जखमेची खूणही राहूं नये, असें काम करितांना अगदीं भिऊं नये, असें होईल तर तो चमत्कार खरा. आतां ज्यांला तुह्मी वीर ह्मणतां, या जातीचे लोक जेजुरीमध्यें सुमारें वीसएक असतील, ते तरवार भोंसकणें या कामासाठीं पूर्वींच आपल्या मांडीची

कातडी ओढून ओढून रक्त मारून पायाच्या तळव्यासारिखी रांठ करितात. आणि केवळ दोन बोटें तरवार भोंसकून लागलीच काढतात, तरी त्यांतून रक्त वाहतें, जखम पडती, व मलमपट्टी वगैरे औषधोपचार करावे लागतात. जेव्हां तो घरीं जातो तेव्हां अगदीं घेरी येऊन अशक्त झाला असतां दुसऱ्या लोकांच्या खांद्यावर हात ठेवून मोठ्या संकटानें जातो, शेवटीं त्या दुःखामुळें महिना दोन महिने घरीं पडून राहतो, याला चमत्कार ह्मणावें काय? नाहीं, हें केवळ ढोंग आहे. बरें, या कामांत तरी ते गारोड्यासारिखे हुशार आहेत काय? नाहीं, ते केवळ गयाळ आहेत. असो, या खंडोबाचा दुसरा कांहीं चमत्कार आहे काय?

**पा०**—होय, आहे. तो पाहिला असतां खंडोबाच्या देवपणाविषयीं तुमची पुरी खातरी होईल.

**सा०**—हं! असा कोणता चमत्कार? तो ऐकूं द्या तरी.

**पा०**—एथें कसब्यामध्यें माझा स्नेही एक देशस्थ ब्राह्मण आहे, त्याच्या घरीं दरवर्षास चंपाषष्ठीच्या दिव-

शीं मोठी यात्रा भरत असते. त्याच्या अंगणांत पांच सहा हात लांब एक चर खणून त्यांत झळझळीत निखारे भरतात आणि त्यांवर पुष्कळ भंडार उधळून तो ब्राह्मण व त्याची बायको व लेंकरें त्या निखाऱ्यांवरून चार पांच वेळ चालतात, तरी त्यांचे पाय पोळत नाहींत. साहेब, हा तर वास्तविक ईश्वरी चमत्कार आहे ना?

**सा०**—शास्त्रीबावा, याविषयीं तुमचें मत कसें आहे?

**शा०**—( कानावर हात ठेवून ) मला पुसूं नका. भटजीस पुसा.

**सा०**—( हांसून ) शास्त्रीबावाला हा चमत्कार खोटा वाटतो, असें साफ दिसतें. भटजी, तुह्मी ब्राह्मण लोक इतके भोळे आहां काय? हा चमत्कार कशाचा! गारोडी लोक तर यापेक्षां चमत्कारिक काम करितात. हे लोक केवळ अग्नीवर चालतात. गारोडी तर आपल्या तोंडांतून देखील जाळ काढतात आणि पाहिजे तर ते तुह्मांला अशी ठकबाजी शिकवितील.

**पा०**—गारोडी कसेंहि करोत, परंतु ते आमचे स्नेही खंडोबाच्या साह्यानें हें काम करितात, अशी माझी खातरी आहे.

**सा०**—कितीहि सांगितलें तरी पालथ्या घागरीवर पाणी. यांत कांहीं ईश्वरी साह्य नाहीं, ही केवळ ठकविद्या आहे. आमच्या देशांत असे पुष्कळ गारोडी आहेत. ते पहिल्यानें आपल्या आंगाला एका प्रकारचा रस लावितात, मग हातावर लोखंडाचा जळजळीत गोळा व निखारे कांहीं वेळ धरितात, ते निर्भयपणें अग्नीवर चालतात. पण यांत कांहीं भक्ति आहे असें नाहीं, ती केवळ युक्ति आहे, असें ते साफ सांगतात. आणि तुह्मीहि असेंच समजा, यांत काडीमात्र देवाची करणी नाहीं, हें खचीत आहे.

**शा०**—बरें साहेब, तुह्मीं खंडोबाचें खंडन बरेंच केलें. तर मग हा खंडोबा मुळीं कोण होता याचा निर्णय होईल काय?

**सा०**—कांहीं विद्वान लोकांनीं याविषयीं फार शोध केला, त्यावरून त्यांस असें समजलें कीं, पूर्वीं जेव्हां ब्राह्मण बौद्ध लोकांशीं लढत होते तेव्हां चंद्र नामें राजा

होता, त्यानें ब्राह्मण लोकांचा पक्ष धरून बौद्ध लोकांस जिंकिलें. तेवेळेस कर्नाटकामध्यें त्यांचा मोठा नाश केला. एळकोट, ह्मणजे कानडी भाषेंत सात कोट, आणि या राजानें सात कोट बौद्ध लोक मारिले असें हिंदु लोक ह्मणत होते, पुढें हा राजा मेल्यावर वेडे लोक त्यास देव मानूं लागले.

आणि मांडींत तरवार भोंसकण्याची चाल कशी चालू झाली हें तुह्मांस ठाऊक आहे काय?

**शा०**—होय, जेजुरींतील लोक ह्मणतात कीं, आह्मी अगोदर मांडी कापीत नव्हतों, पण गळा कापीत होतों.

**सा०**—यांत संशय नाहीं. खंडोबाला आपल्या शत्रूंचें रक्त फार आवडतें असें समजून ते गरीब लोकांस मारीत असत, आणि या क्रूर देवाला त्यांचें रक्त अर्पीत असत. परंतु जीव घेणें हें मोठें पातक आहे असें समजून हल्लीं केवळ मांडी कापतात. आणि हें कामहि देवाच्या कृपेनें लवकरच बंद होईल असें वाटतें.

**पा०**—पण साहेब, खंडोबा जर खोटा आहे तर आह्मीं कोणत्या देवास भजावें?

**सा०**—सर्वांचा उत्पन्न करणारा व पोषण करणारा कोण?

**पा०**—उत्पन्न करणारा व पोषण करणारा एक ईश्वर आहे.

**सा०**—त्यालाच भजावें.

**पा०**—तो तर दृष्टीस पडत नाहीं. मग त्याला कसें भजावें?

**सा०**—जरी तो अदृश्य आहे तरी तुह्मी आपल्या मनामध्यें विचार करून त्याचे उपकार माना, त्याची स्तुति व प्रार्थना करा. ईश्वर सर्व ठिकाणीं आहे. जेजुरीस कधीं जाऊं नये. हा खंडोबा देव अगदीं अडाणी मनुष्यांनीं कल्पिला आहे. हें माझें बोलणें तुमच्या मनांत बिंबलें काय पाटील?

**पा०**—मी काय सांगूं साहेब! ही गोष्ट मीं आजच ऐकिली.

**सा०**—तरी वास्तविक आहे. नका रे नका गड्यांनो, या कामांत पडूं नका. एक गोष्ट मात्र सां-

गायाची राहिली. पाटील, हिंदु लोक किती अवतार मानीत असतात?

**पा०**—दाहा.

**सा०**—होय, विष्णूचे दाहा आणि शिवाचे चोवीस, त्यांतील खंडोबाही अवतार आहे. असें मी ऐकिलें, परंतु ही गोष्ट खरी नाहीं.

**पा०**—बरें तर किती आहेत?

**सा०**—खऱ्या देवाचा अवतार पुसाल तर एकच आहे. पाटील, तुमच्या ऐकण्यांत किती देव आहेत?

**पा०**—पुष्कळ.

**सा०**—होय, खोटे देव पुष्कळ. परंतु खरा देव एकच आहे.

**पा०**—तो कोण आणि त्याचें नांव काय?

**सा०**—परमेश्वर, भगवान, हाच खरा देव. विठोबा, खंडोबा इत्यादि सर्व खोटे आहेत. या खऱ्या परमेश्वराचा एक अवतार कशासाठीं झाला हें तुह्मांस माहीत आहे पाटील?

**पा०**—जे पापी आहेत त्यांचा नाश करावयास झाला असेल.

**सा०**—सर्व माणसें पापी आहेत, सर्वांनीं ईश्वरास सोडिलें होतें, ह्मणून जर सर्वांचा नाश झाला असता तर यांत कांहीं आश्चर्य नसतें. परंतु ईश्वर प्रीतिरूप आहे ह्मणून लोकांचें तारण करावयास त्यानें अवतार धरिला.

**पा०**—साहेब, आमचे लोक ह्मणतात कीं देव एक वेळ मासा झाला, एक वेळ कांसव झाला, हें खरें आहे काय?

**सा०**—खोटें, अगदीं खोटें, मास्यांला किंवा कांसवांला तारावयास तो आला नाहीं, तो मनुष्यांला तारावयास आला; ह्मणून त्यानें मनुष्यरूप धरिलें. या जगांत येऊन त्यानें पापी लोकांस मारिलें नाहीं, पण तोच त्यांच्याबद्दल मेला.

**पा०**—ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे.

**सा०**—ईश्वराचीं सर्व कामें चमत्कारिक आहेत. त्याची दया अपार आहे ह्मणून त्यानें असें केलें. ही गोष्ट ऐकून तुह्मी त्याचा उपकार माना आणि त्यावर फार प्रीति करा. तो बापाप्रमाणें तुह्मावर प्रीति करतो ह्मणून तुह्मीहि त्याजवर लेंकराप्रमाणें प्रीति करा.

ईश्वर सर्व लोकांस ह्मणतो कीं, "अहो सर्व माझ्या लेंकरांनो, तुह्मी मजकडे या, तुह्मी खोट्या देवांला मानूं नका, मूर्तिपूजा कधीं करूं नका. खंडोबा, विठोबा इत्यादि खोट्या देवांचें नांव देखील घेऊं नका. परंतु जो तारणाचा उपाय मीं केला आहे त्यावर तुह्मी विश्वास ठेवा."

पा०—साहेब, ही गोष्ट मला अगदीं फोडून सांगितली पाहिजे. नाहीं तर तुह्मी गेल्यावर ती माझ्या ध्यानांत कशी राहील?

तेव्हां मी ह्मणालों, विस्तारानें सांगण्यास आतां अवकाश नाहीं. तरी संक्षेपानें कांहीं सांगतों. केवळ एक अवतार झाला असें मीं तुह्माला सांगितलेंच आहे, त्या अवताराची गोष्ट जर तुमच्या मनांत बिंबेल तर तुमचें अवश्य कल्याण होईल, आणि त्या वेळेस तुह्मी खंडोबाला सोडाल. सोनें मिळाल्यास पितळ नको. येशू ख्रीस्त हा तारणारा आहे असें तुह्मीं ऐकिलें कीं, काय?

पाटील ह्मणाला, ऐकिलें खरें.

मी ह्मणालों, अगोदर आमचे लोक दुष्कर्मी,

नीच व दुःखी होते. तारणाची किंवा नीतीची गोष्ट आह्मांस समजत नव्हती. पाप दूर होण्यासाठीं आह्मी अनेक क्रूर साधनें करीत होतों, परंतु पाप दूर होईना. त्या वेळेस दुसऱ्या देशांतून उपदेशक येऊन येशू ख्रीस्ताची गोष्ट आह्मास सांगूं लागले. ते ह्मणाले, ईश्वरानें मनुष्य जातीवर इतकी प्रीति केली कीं त्यानें हा तारणारा वरून पाठवून दिला आहे, हा लोकांचा जामीन झाला, आणि जसा जामीन मित्राचें ऋण फेडतो तसा हा मनुष्यांचें ऋण फेडतो, ह्मणजे त्यांच्या पापाचें शासन सोसतो. हा केवढा चमत्कारिक जामीन आहे! तो आपल्या शत्रूचेंहि ऋण फेडतो, तो लोकांसाठीं मेला, परंतु फिरून जिवंत झाला आणि वर देवाजवळ गेला. जे सर्व लोक त्याजवर भरंवसा ठेवितात, तेहि मेलेल्यांमधून उठतील आणि देवाजवळ बसून सर्वकाळचें परम सुख पावतील. असें ते उपदेशक बोलले. ही गोष्ट ऐकून आह्मी विश्वास धरला आणि येशू ख्रीस्ताचे शिष्य झालों. आह्मी वाडवडिलांचा धर्म सोडला ह्मणून आह्मावर त्या देवांचा राग झाला असेल असें

कदाचित् तुह्मास वाटत असेल पाटील, परंतु त्या दिवसापासून आमचें कल्याण होत चाललें. जे येशूचे खरे शिष्य आहेत त्यांचें मन शांत असतें, आणि अधिक अधिक निर्मळ होत जातें. ते पापाचा द्वेष करितात. आणि ते ईश्वराचीं प्रिय लेंकरें आहेत. ईश्वर त्यांशीं सर्वकाळ दयाळू बापाप्रमाणें वागतो. ही चमत्कारिक गोष्ट आहेना, पाटील ?

पाटील ह्मणाला, चमत्कारिक खरी. तुह्मावर देवाचे फार उपकार झाले, तुह्मी सुखी आहां, आमचे लोक फार दुःखी आहेत.

मग मी ह्मणालों, तुह्मी दुःखी आहां खरें, पण त्याचें कारण काय बरें ? आह्मीं जो उपाय केला तो उपाय तुह्मी करा. तुह्मी खोट्या देवांस टाकून खऱ्या देवाला पत्करा. खंडोबा इत्यादि खोटे तारणारे सोडून येशू ख्रीस्ताला धरा. मग जें तारण आह्मास प्राप्त झालें तें तुह्माला प्राप्त होईल. आह्मी परंपरागत धर्म सोडणार नाहीं असें तुह्मी ह्मणूं नका. हें बोलणें तर व्यर्थ आहे. काय, चोराच्या लेंकरांनीं चोरीच करावी ? व्यभिचारिणीच्या कन्येनें व्यभिचारिणीच

व्हावें ! नाहीं, असें नाहीं. परंपरागत असो किंवा नसो, तरी पाप सोडलें पाहिजे, असा ईश्वराचा दृढ हुकूम आहे. दुसरी एक गोष्ट सांगतों, ऐका पाटील. तुमचा खंडोबा बुडेल. खऱ्या शास्त्रांत असें साफ सांगितलें आहे कीं, खोटे देव आणि खोटे तारणारे राहणार नाहींत. एकच देव ह्मणजे ईश्वर आणि एकच अवतार ह्मणजे येशू ख्रीस्त, असें पृथ्वींतील सर्व लोक कबूल होतील. आणि खंडोबाचें नांवदेखील लोकांच्या तोंडीं राहणार नाहीं. खंडोबा बुडेलच, परंतु तो आपण बुडल्यापूर्वीं तुह्मास बुडवील असें मला भय आहे. ही गोष्ट जरी तुह्मी पत्करणार नाहीं तर एक मात्र उपाय राहिला. मी घरीं जाऊन तुह्मासाठीं रडेन आणि ईश्वरापाशीं प्रार्थना करीन.

मग मी त्याला कांहीं पुस्तकें देऊन सांगितलें कीं, हीं पुस्तकें तुह्मी चित्त लावून वाचा. हीं वांचते वेळेस तह्मी रागें भरूं नका. ज्या लोकांनीं हीं पुस्तकें केलीं ते तुमचे कल्याण इच्छिणारे आहेत, ते तुमची थट्टा किंवा निंदा करायास इच्छित नाहींत, पण तुमचें कल्याण व तारण व्हावें असें इच्छितात, ह्मणून हीं

पुस्तकें वाचते वेळेस तुह्मी ईश्वराची अशी प्रार्थना करा कीं, "हे ईश्वरा, खरा मार्ग कोणता हें मला बरोबर समजत नाहीं. ह्मणून या पुस्तकांमध्यें ज्या खऱ्या गोष्टी असतील त्या गोष्टी माझ्या मनांत बिंबीव." असें जर न केलें तर तुमचें वाचणें व्यर्थ होईल. जो सत्य-शोधक आहे त्यास तारणाचा मार्ग सांपडतो, इतरास सांपडत नाहीं.

---

**सूचना.**—ह्या पुस्तकांत जी गाडे बगाडाची गोष्ट आली आहे, तिजविषयीं वाचकांनीं असें समजावें कीं, ती पूर्वींची आहे. अलीकडे आमच्या दयाळू इंग्रज सरकारानें ही क्रूर चाल बंद केली आहे.

( एडिटर, ज्ञा. सो. )

समाप्त.

BOMBAY: PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA

